# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.४५/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २४ जून, २०२२.

प्रति,
सर्व **महानगरपालिका आयुक्त**,
सर्व **जिल्हाधिकारी**,
सर्व **मुख्याधिकारी**, नगरपरिषद/ नगरपंचायत.

**विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०२२**
**मतदार यादीवरील हरकती व सूचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित प्रभागांमध्ये विभागून वापरण्यात येते. असे करताना सदर मतदार यादीमध्ये विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा विधानसभा यादीमध्ये असलेली नावे वगळण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीकरिता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

२. मतदार यादी विभाजन करताना केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात येणाऱ्या मतदारांचे, त्यांच्या विधानसभा मतदार यादीतील वास्तव्याच्या पत्त्यानुसार, संबंधित प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येते. असे विभाजन करताना जर एखाद्या मतदारास चुकीचा प्रभाग वाटप झाल्यास, त्याबाबत त्यांना हरकत नोंदविता येते. सदर हरकतीचा विचार करुन, त्या व्यक्तीचे नाव योग्य त्या प्रभागात समाविष्ट करण्यात येते.

३.	विधानसभेच्या मतदार यादीमध्ये नमूद असलेले सेक्शन ॲड्रेस हे बऱ्याचदा एकापेक्षा अधिक प्रभागांमध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे मतदार यादीचे विभाजन करताना स्थळ पहाणी करुन प्रभाग रचनेच्या नकाशानुसार सदर मतदार असलेले क्षेत्र ज्या प्रभागात समाविष्ट होते, त्याच प्रभागात त्यांचे नाव दर्शविणे आवश्यक आहे. असे करताना देखील जर एखाद्या मतदाराने त्याचे राहण्याचे ठिकाण बदलले असेल मात्र विधानसभेच्या मतदार यादीमध्ये त्याच्या बदललेल्या पत्त्याची नोंद घेण्याकरिता अर्ज करुन पत्ता बदलला नसेल तर अशा मतदारांची नावे नवीन पत्त्यानुसार समाविष्ट करता येत नाहीत. मात्र जर इमारतीतील सर्वच मतदारांची नावे सेक्शन ॲड्रेसनुसार दुसऱ्या प्रभागात जात असतील, तर नकाशानुसार ती इमारत ज्या प्रभागात समाविष्ट होते, त्या प्रभागात त्या मतदारांची नावे ठेवणे आवश्यक आहे.

४.	राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, मतदार यादीसंदर्भात एक-गठ्ठा हरकती नोंदविण्यात येतात. यामध्ये एकाच अर्जामध्ये मोघम उल्लेख करुन अनेक मतदारांची नावे या प्रभागामधून त्या प्रभागात टाकण्याबाबत विनंती असते.

वास्तविक प्रसिध्द केलेल्या प्रारुप मतदार यादीवर संबंधित मतदाराने आपले नाव तपासून ते योग्य प्रभागात समाविष्ट नसल्यास त्या अनुषंगाने मतदार यादीतील अनुक्रमांक व त्याचा पत्ता यासह हरकत अर्ज दाखल करणे आवश्यक असते, जेणेकरुन निवडणूक यंत्रणेला अशा मतदारांची नावे योग्य प्रभागात समाविष्ट करणे शक्य होऊ शकते.

५.	काहीवेळा मोघम तक्रार अर्जांच्या आधारे मतदार यादीतील नावे एका प्रभागामधून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात येतात. मात्र प्रत्यक्ष निवडणुकीच्या दिवशी मतदार मतदानास गेले असता, त्यांना त्यांची नावे संबंधित प्रभागाच्या मतदार यादीत आढळून येत नाहीत. पर्यायाने त्यांना त्या प्रभागात मतदानाचा हक्क बजावता येत नाही. अशा तक्रारी टाळण्याकरिता हरकत अर्ज योग्य माहितीच्या आधारे दाखल करणे आवश्यक आहे. अनेकदा त्रोटक अगर अर्धवट माहिती असलेल्या हरकतींवर कार्यवाही करणे कठीण होते. तसेच अनेकदा हरकतीसोबत वास्तव्याचे पुरावे इत्यादी बाबी जोडलेल्या नसतात.

६.	मतदार यादीवरील हरकत अर्जांचा योग्य व जलद निपटारा होण्याच्या उद्देशाने, हरकत अर्जांमध्ये आवश्यक बाबींचा उल्लेख असण्यासाठी आयोगाने एक नमुना हरकत अर्ज सोबत परिशिष्ट “अ” मध्ये विहित करुन दिला आहे. तसेच आयोगाच्या “ट्रू-वोटर” ॲप्लिकेशनमध्ये देखील मतदारांना सोप्या पध्दतीने हरकत नोंदविण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर नमुन्यास तसेच मोबाईल ॲप्लिकेशन “ट्रू-वोटर” यास योग्य ती प्रसिध्दी देऊन अर्जदाराने शक्यतोवर सदर नमुन्यात अर्ज अगर मोबाईल ॲप मार्फत हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,



( अविनाश सणस )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.------------------दि. -------- सोबतचे परिशिष्ट-अ)

--------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ----------

**विषय :- प्रारुप मतदार यादीवरील हरकत अर्ज.**

प्रति,
प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
प्रभाग क्रमांक ---------
-------------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव)

हरकतदाराचे नाव --------------------
संपूर्ण पत्ता ---------------------- (रहिवासाचा पुरावा जोडावा.)
संपर्क क्रमांक / मोबाईल क्रमांक ------------------------

| अ.क्र. | नाव | विधानसभा क्र./ यादीभाग क्र. /व अनुक्रमांक | प्रारुप मतदार यादीतील प्रभाग क्रमांक | प्रारुप मतदार यादीच्या प्रभागातील अनुक्रमांक | ज्या प्रभागात नाव समाविष्ट होणे अपेक्षित आहे, तो प्रभाग क्रमांक | रहिवासाबाबतच्या जोडलेल्या पुराव्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| उदा. | श्री.----- | २५/२०८/९१६ | ५ | ६५०१ | ६ | आधार कार्ड |

हरकतदाराची स्वाक्षरी

(नाव --------------------)

टीप -

१) हरकतदार स्वत: अर्ज सादर करु शकत नसल्यास -
सदर अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव :- ---------------------- मोबाईल नं.------------

२) जोडलेल्या पुराव्यांची संख्या --------------